अध्यक्ष जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
जळगांव

वाचा: १) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
२) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८८७
३) सार्वजनीक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचनाः कोरोना २०२०/ प्रक्र ५८/ आरोग्य/५ दि१४ /०३/२०२०
४) मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील आदेश क्र दंडप्र-०१/कावि/२०२०/१९२ दि ०८/०५/२०२०
५) मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील आदेश क्र दंडप्र-०१/कावि/२०२०/१९५ दि ०९/०५/२०२०
६) मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील आदेश क्र दंडप्र-०१/कावि/२०२०/२०९ दि १३/०५/२०२०
७) मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील आदेश क्र दंडप्र-०१/कावि/२०२०/१९७ दि ०९/०५/२०२०
८) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/नप्रक्र १२४/आरोग्य ३ अ सार्वजनीक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई दि १३/०५/२०२०

आदेश जाक्र/साप्रवि/आरआर/७२ /२०२०
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जळगांव
दिनांक 14/०५/२०२०

ज्याअर्थी, संदर्भ क्र ३ मध्ये नमुद सार्वजनीक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना कोरोना २०२०/ प्रक्र ५८/ आरोग्य/५ दि १४/०३/२०२० अन्वये कोरोना विषाणु (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा हा दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २,३,४ मधील तरतुदीच्या अमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असुन मा.जिल्हाधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी मा.जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव जिल्हयासाठी आरोग्य सुविधांचे वर्गीकरण त्रिस्तरीय रचना करण्यासाठी, आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता संदर्भ क्र ६ अन्वये माझी नियुक्ती शहर महानगरपालीका वगळुन, उर्वरीत जळगांव जिल्हा(नगरपालीका /नगरपंचायत कार्यक्षेत्रासह) कार्यक्षत्रातील आरोग्य सुविधांचे त्रीस्तरीय वर्गीकरण करणे व सर्व संबधीत यंत्रणा, घटक यांचेशी समन्वय साधुन आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता Incident Commander म्हणुन घोषीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी जळगांव जिल्हयातील रुग्णांची वाढती संख्या पहाता जळगांव जिल्हयातील Covid Care Centre/ Dedicated Health Centre(CCC), Dedicated Covid Hospital(DCH) मधील सोयी सुविधांच्या अनुषंगाने नियंत्रण व समन्वय ठेवण्याकरीता तसेच रुग्णांना यथोचित आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता सक्षम अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे, असे माझे मत झालेले आहे.

तसेच संदर्भ क्र ६ मधील मुददा क्र ३ अन्वये प्रत्येक Containment Zone साठी एका अधिका-याची स्वतंत्र नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्याबाबत निर्देशीत केलेनुसार व मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी खालील प्रमाणे आदेशीत करीत आहे.

जिल्हास्तरावर कोव्हीड १९ संबधी जिल्हा नोडल अधिकारी म्हणुन डॉ. श्री एन.एस.चव्हाण, जिल्हा शल्यचिकीत्सक, सामान्य रुग्णालय जळगांव यांची नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे सर्व प्रकारचे अहवाल वेळोवेळी Incident Commander यांना सादर करावेत.

तालुकास्तरावर Covid Care Centre/ Dedicated Health Centre(CCC), Dedicated Covid Hospital(DCH) साठी नोडल अधिकारी म्हणुन वैदयकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय /उपजिल्हा रुग्णालय यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

| अक्र | विवरण | जबाबदा-या |
|---|---|---|
| १ | जिल्हा स्तरावर Covid Care Centre/ Dedicated Health Centre, Dedicated Covid Hospital साठी नोडल अधिकारी म्हणुन जिल्हा शल्यचिकीत्सक यांच्या कर्तव्य व जबाबदा-या | १) सर्व तालुकास्तरावर आवश्यक ती वैदयकीय सुविधा, तांत्रीक मनुष्यबळ,आवश्यक औषधीसाठा, आवश्यक साधनसामुग्री, आवश्यक उपकरणे, रुग्णवाहीका, शववाहीका इ सुविधा उपलब्ध करुन देणे बाबतचे संनियत्रण करणे.<br>२) आपले अधिनस्थ असणा-या ग्रामीण रुग्णलयातील सर्व वैदयकीय अधिक्षक यांचेवर संनित्रण, पर्यवेक्षण इ करणे.<br>३) CCC/DCHC मधील बायोमेडीकल वेस्टची विल्हेवाट लावणे.<br>४) आर.बी.एस.के कडील कर्मचारी, अधिकारी उपलब्ध करुन देणे<br>५) प्रत्येक CCC/DCHC साठी आवश्यक कर्मचारी, अधिकारी यांचे नियुक्तीचे आदेश देणे, तसेच संबधीत कर्मचारी अधिकारी डयुटी चार्ट तयार करुन देणे व त्यानुसार अमलबजावणी करणे.<br>६) कोव्हीड योध्दा ची नेमणुक करणे.<br>७) दैनंदिन अहवाल संकलन करणे, एकत्रीकरण करणे व राज्यस्तरावर सादर करणे.<br>८) ग्रामीण भागातील पॉझीटीव्ह केसेसची एकत्रीत यादी, मयत रुग्णांचे मॉरटेलीटी फॉर्म, सीआयएफ फॉर्म, कॉन्ट्रेक्ट ट्रेसींग फॉर्म त्वरीत कॉन्ट्रक्ट ट्रेसींग नोडल अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे. |
| २ | तालुकास्तरावर Covid Care Centre/ Dedicated Health Centre साठी नोडल अधिकारी वैदयकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय हे राहतील. | कर्तव्य व जबाबदा-या<br>१) CCC/DCHC च्या कामकाजाचे संनित्रण करणे.<br>२) सकाळी व संध्याकाळी प्रत्यक्ष रुग्णांना भेट देणे. त्यांना मिळणा-या औषधोपचार व इतर सोईबाबत येणा-या अडीअडचणी दुर करणे व तसा दैनंदिन अहवाल जिल्हा नोडल अधिकारी यांना सादर करणे.<br>३) CCC/DCHC मध्ये दाखल होणा-या कोरोना संशयीत रुग्णांचे फॉर्म A, सीआयएफ फॉर्म भरणे, तसेच त्या संशयीत रुग्णांच्या संपर्कातील (हाय रिस्क) व्यक्तिची माहीती(नांव, मोबाईल क्र, वय इ ) घेणे. मृत्यु झाल्यास Mortality Form भरणे. व त्वरीत जिल्हा नोडल अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे.<br>४) CCC/DCHC मध्ये संशयीत रुग्णांचे स्वॅब घेणे. तपासणीसाठी पाठविणे. तसेच दैनंदिन स्वॅब तपासणीची यादी दैनंदिन जिल्हा नोंडल अधिकारी यांना सादर करणे.<br>५) सार्वजनीक आरोग्य विभागाकडील दैनंदिन अहवालाच्या नमुन्यात दैनंदिन अहवाल सादर करणे.<br>६) CCC/DCHC साठी आवश्यक असणा-या दैनंदिन साधन सामुग्री, औषधीसाठा इ बाबत जिल्हा नोंडल अधिकारी यांना अवगत करणे.<br>७) CCC/DCHC साठी अधिकारी व कर्मचारी यांचे हजेरी बाबतच्या नोंदी घेणे. जिल्हा नोडल अधिकारी यांनी ठरवुन दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे CCC/DCHC कामकाजावर संनित्रण ठेवणे.<br>८) CCC/DCHC साठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांचे दैनंदिन डयुटीचार्ट दर्शनी भागावर लावावा व त्याप्रमाणे कामकाज होते किंवा नाही ते तपासावे.<br>९) CCC/DCHC Centre मध्ये दाखल रुग्ण, स्वॅब घेतलेले रुग्ण, उपचार घेत असलेले रुग्ण इ बाबतचा दैनंदिन अहवाल जिल्हा नोडल अधिकारी यांना दररोज दुपारी ३ वाजेपर्यत सादर करावा. (याठी स्वतंत्र कर्मचारी यांची नियुक्ती करावी, नियुक्त केलेल्या कर्मचारी यांचा संपर्क क्रमांक खाली दिलेल्या ईमेलवर सादर करावा) अहवाल विहीत वेळेत सादर करण्याची दक्षता घ्यावी तसेच वैदयकीय अधिक्षक यांनी याबाबत दैनंदिन अहवालाबाबत खात्री करावी.<br>१०)CCC/DCHC Centre मधुन संशयीत रुग्ण हे बाहेर जाणार नाही याची जबाबदारी वैदयकीय अधिक्षक यांची राहील. त्यासाठी आवश्क पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन दयावा. |
| ३ | कार्यकारी अभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग यांच्या कर्तव्य व जबाबदा-या | संबधीत उपअभियंता यांनी Covid Care Centre/ Dedicated Health Centre साठी आवश्यक पलंग,गादी, किरकोळ दुरुस्ती, पाणीपुरवठा,विजपुरवठा इ कामांची आवश्यक ती परवानगी कार्यकारी अभियंता यांचेकडुन घेवुन पुर्ण करावेत.यासाठी आवश्यक निधी कार्यकारी अभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग यांचेकडेस मागणी करावी. कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांनी सदर मागणी घेवुन मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडेस निधी मागणी करावी. |

Scanned by CamScanner

## सर्वसाधारण सुचना

१) प्रत्येक CCC/DCHC साठी कार्यकारी अभियंता,सार्वजनीक बांधकाम विभाग यांनी संबधीत कार्यक्षेत्रातील शाखा यांची नियुक्ती करावी. या संपुर्ण कामकाजावर कार्यकारी अभियंता जळगांव यांनी संनियंत्रण करावे.

२) CCC/DCHC मध्ये रुग्णासाठी जेवणाची व्यवस्था तहसिलदार तथा Incident Commader यांनी करावी. यामध्ये एका दिवसाला एका रुग्णासाठी जास्तीत जास्त १५० रुपये खर्च करण्याची मुभा राहील, त्यामध्ये जेवणामध्ये सकाळचा नाश्ता व आयुष विभागाने सुचविलेला काढा दयावा, दुपारचे जेवण, सायंकाळचे हळदीचे दुध व रात्रीचे जेवण इ समावेश असावा. रात्रीचे जेवण ८ पुर्वी देण्याची दक्षता घ्यावी.

३) सदर बाबीवरील खर्चाची मागणी तहसिलदार यांनी मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडुन करावी व निधी उपलब्ध करुन घ्यावा.

४) सदरचा जेवणाचा पुरवठा हा CCC/DCHC मध्ये प्रत्यक्ष वाटप पध्दतीने करावा, पार्सल देवु नये वा बाहेरुन पार्सल आणु नये.

५) CCC/DCHC बंदोबस्तासाठी तहसिलदार यांनी संबधीत पोलीस स्टेशन मधील आवश्यक तो पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन दयावा.

६) CCC/DCHC साठी पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह साठी पाणी, व वापरायचे पाणी, शौचालयाच्या स्वच्छता व इतर स्वच्छता करणेची जबाबदारी ही संबधीत नगरपालीका, नगर परिषदेची राहील.

७) CCC/DCHC साठी मुख्याधिकारी यांनी स्वच्छता कर्मचारी यांची स्वच्छतेसाठी ३ शिफ्टमध्ये डयुटी लावावी.

८) रुग्णांचे बेडशिट धुणेसाठी लॉंड्रीची व्यवस्था करण्याची जबाबदारी संबधीत नगरपालीका/ नगरपरिषदेची राहील.

९) तहसिलदार तथा Taluka Incident Commader यांनी त्रिस्तरीय रचनेकरीता आवश्यक ते मनुष्यबळ, खाजगी रुग्णालय, साधन सामुग्री व उपकरणे, रुग्णवाहीका,खाजगी वाहने, शववाहीका आवश्यकतेनुसार अधिग्रहीत करावेत.

प्रत्येक CCC/DCHC चे कामकाज उपरोक्त प्रमाणे योग्यरित्या होत आहे किंवा कसे याबाबत संपुर्ण संनित्रण , तपासणी, पर्यवेक्षण करणेची जबाबदारी संबधीत उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांची राहील.

यासोबत भारत सरकार व महाराष्ट्र शासना मार्फत वेळोवेळी निर्गमीत होणा-या सर्व निर्णय सर्व स्तरावर लागु असतील

उपरोक्त नमुद अधिकारी यांनी सदर आदेशाचे तात्काळ अमलबजावणी करुन कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने जबाबदारीनुसार आवश्यक तो कार्यवाही करावी

(गोरक्ष गाडीलकर)
अध्यक्ष जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
जळगांव तथा Incident Commander

प्रतः माहीतीस्तव सविनय सादर

१) म.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग नाशिक
२) मा.जिल्हाधिकारी,जळगांव
३) मा.पोलीस अधिक्षक, जळगांव
४) म.अधिक्षक अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग जळगांव

प्रतः माहीतीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

1) डॉ .एन.एस चव्हाण, जिल्हा शल्यचिकीत्सक, सामान्य रुगणालय जळगांव
2) उपविभागीय दंडाधिकारी, (सर्व) जि जळगांव
3) तहसिलदार, (सर्व) जि जळगांव
4) गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
5) मुख्याधिकारी, नगरपालीका/ नगरपरिषद (सर्व) जि जळगांव
6) वैदयकीय अधिक्षक.(सर्व) ग्रामीण रुग्णालय /उपजिल्हारुग्णालय
7) शाखा अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग

Scanned by CamScanner